वर्ष १५ • अंक ६ • १६ सप्टेंबर २०१५

किंमत रु. १५/-

पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

पा ल क नी ती

पालकत्वाला वाहिलेले मासिक

संपादक
संजीवनी कुलकर्णी

संपादक मंडळ
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

मुखपृष्ठ, अंक मांडणी व रेखाटने
वसीम मणेर

मुखपृष्ठ
डॉ. जेनी सुक्लिफ लिखित
बेबी बाँडिंग
या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील
छायाचित्राचे रेखाटन

अक्षरजुळणी
स्वाती जामदार

जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००

वर्गणीचा चेक / ड्राफ्ट
'पालकनीती परिवार'
या नावाने काढावा.

संपर्क :
पालकनीती परिवार,
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४११५२३
०२१६६ २२३०४१
psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक ६ वा
१६ सप्टेंबर २०१५

लेखांत व्यक्त
झालेली मते लेखकांची
व्यक्तिगत समजावीत.

या अंकात

- **जगण्याचं शहाणपण**
- **बंध हवेसे** – सूनृता सहस्रबुद्धे
- **आदित्य – कहाणी एका लढ्याची** – राजश्री काकडे, स्वाती कदम
- **शिशूंना उद्दीपन** – सुषमा साठ्ये
- **मुलांतील वाढती आक्रमकता आणि आपण** – गिरिजा तुळपुळे
- **विचार करून पाहू –**
  माझ्या मुलीने काय शिकावे असे मला वाटते? – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **शहाणी वेबपाने – मानवतावादी, स्पष्ट आणि खणखणीत!** – मधुरा राजवंशी

प्रिय वाचक,

पालकनीतीच्या मागच्या म्हणजे ऑगस्टच्या अंकात पालकनीतीच्या संपादनाची जबाबदारी बालशिक्षणाच्या आणि बालविकासाच्या क्षेत्रात काम करणाऱ्याच काही संस्थांनी घ्यावी असा विचार मांडलेला होता, त्याला काही प्रतिसादही मिळत आहे. मात्र अद्याप निश्चित निर्णय कोणत्याही संस्थेसोबत झालेला नाही. येत्या तीन महिन्यांमध्ये या संदर्भात जे काही घडेल ते आम्ही तुम्हापर्यंत पोचवूच.

पालकनीतीची सुरुवात १९८७ जानेवारीत संजीवनीने केल्यापासून ते पालकनीतीचा गट तयार होऊन अठ्ठावीस वर्षं पालकनीती हा विचार आम्ही आपल्यापर्यंत अत्यंत सातत्याने पोचवत आलेलो आहोत. त्यानंतर एक वर्ष फलटणच्या प्रगत शिक्षण संस्थेच्या गटानेही त्याच प्रकारे निभावलेले आहे. मात्र कुणा एकाचे किंवा एकेरी दृष्टीने मांडलेले हे विचार नसावेत आणि त्यामध्ये संवाद असावा असाच आग्रह आम्हा सर्वांचाच होता. याच कल्पनेचा पाठपुरावा यानंतरच्या काळातही होत राहावा अशी आमची केवळ इच्छाच नाही तर अपेक्षाच आहे. वेगवेगळ्या व्यक्ती-संस्थांनी पालकनीतीची रचना करावी असा विचार करण्यामागेही हेच आहे.

आपल्या मुलाबाळांनी विचारी व्हावे, सशक्तपणे जीवनाला सामोरे जावे असे प्रत्येक पालकाला आणि एकंदर समाजाला वाटत असते असे आपण मानतो, मात्र परंपरा आणि चाकोऱ्यांच्या चौकटींमध्ये तसे घडणे किती अवघड असते हेही आपल्याला जाणवत असते. आपण प्रत्येकजणही परंपरांच्या विळख्यांमध्ये नकळत अडकत गेलेलो असतो. आपल्या दृष्टीकोनांवर त्या चौकटींची अभ्रं चढलेली असतात. अशा परिस्थितीत मोकळ्या विचारांचा श्वास घेणं तर अवघड असतंच, त्याहून वाईट गोष्ट अशी असते की, असं होतंय याचीही जाणीव आपल्याला अनेकदा नसते. म्हणून पालकनीती या संकल्पनेचं औचित्य आजही आहे.

वाचकांपैकी ज्या कुणाला पालकनीती सुरू ठेवण्यासाठी सहकार्य करण्याची इच्छा आणि शक्यता असेल त्यांनी प्रियंवदा बारभाई (९८२२४७५८२३) किंवा संजीवनी कुलकर्णी (९८२२००१४७७) यांच्याशी संपर्क साधावा.

संपादकीय मंडळ

संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक – डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे-४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे-४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

संवादकीय

गेल्या दोन दशकांमध्ये तंत्रज्ञानात झालेल्या प्रगतीमुळे मेंदू व मज्जासंस्था, वर्तनशास्त्र व सामाजिक शास्त्रे यांचा पूर्वी कधी नाही इतका सखोल अभ्यास झाला. बालकाच्या वाढीमध्ये अनुवंश आणि संगोपन यांचा नेमका काय आणि किती वाटा आहे, याबद्दल काही नव्याच गोष्टी समजल्या असं जरी नसलं तरी या दोनही बाजूंनी बालकाचं व्यक्तिमत्त्व कसं बनत असतं हे समजल्याचा बालकांच्या विकासकामी कसा उपयोग करून घेता येईल आणि बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांना कशी तयारी करता येईल, याविषयीचे मूलभूत काम गेल्या साडेतीन दशकांमध्ये सुरू झालेले आहे.

गर्भधारणेपासून ८ वर्षांपर्यंतच्या कालावधीत बालकाच्या शारीरिक, कारक, भावनिक, सामाजिक, भाषिक, मूल्यात्मक व बोधात्मक अशा सर्वच क्षमता आयुष्यात सर्वात अधिक वेगाने विकसित होत असतात. निव्वळ वेगापेक्षाही या वयातील विकास दुसऱ्या एका कारणासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे; ते म्हणजे त्याचा दूरगामी परिणाम. एखाद्या व्यक्तीचा स्वभावविशेष व शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य कसे असणार आहे या गोष्टींचा पाया म्हणजे पहिल्या आठ वर्षांतील विकास असतो. आयुष्यात पुढे ही व्यक्ती आपले शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करणार आहे का प्राथमिक शाळेतच शाळाबाह्य होणार आहे? गुन्हेगारीसारख्या समाजविघातक गोष्टी करण्याकडे तिचा कल असणार आहे की ती समाजोपयोगी गोष्टी करणार आहे? या बाबी मोठ्या प्रमाणावर ठरतात त्या व्यक्तीला आयुष्याच्या पहिल्या ८ वर्षांत आलेल्या अनुभवांवर. तिच्या बालपणात तिच्या गरजा पूर्ण करण्यातील तत्परता, तिला दिलेला सकारात्मक प्रतिसाद यावर तिची बाह्य उद्दीपनांना दिलेली प्रतिक्रिया अवलंबून असते. तिचे अनुभव सकारात्मक असतील तर तिची प्रतिक्रिया संयमित असते. तिचे अनुभव नकारात्मक असतील तर तिची प्रतिक्रिया अतिरेकी असू शकते. जन्मापासून ८ वर्षांपर्यंतचा पाया भक्कम तर पुढे मुले चांगली नागरिक बनतात. गुन्हेगारीकडे वळण्याचे त्यांचे प्रमाण कमी असते. माध्यमिक शालांत परीक्षा चांगल्या प्रकारे पास होणे व पर्यायाने अधिक चांगली नोकरी मिळवणे यात ही मुले यशस्वी होतात (योशिकावा १९९५).

या वयात मुलांच्यावर घरच्या वातावरणाचा जितका परिणाम होतो, तितकाच परिसर व समाजातील वातावरणाचाही होतो. आईचे आरोग्य व पोषण, कुटुंबाच्या बालसंगोपानाविषयीच्या संकल्पना, दारिद्र्य अथवा सुबत्ता, आरोग्य सेवांची उपलब्धी, घरे व परिसरातील स्वच्छता, येथे आढळणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष हिंसा, पाळणाघरे अथवा सांभाळणाऱ्या व्यक्तींची उपलब्धी या साऱ्यांचा सर्वाधिक व कायमस्वरूपी परिणाम होतो तो ०-३ वयोगटातील मुलांवर. त्यातही मुली, विशेष गरजा असणारी मुले, व अल्पसंख्याक समाजातील मुले यांच्यावर या घटकांचा अधिक परिणाम होतो. याचा थेट संबंध आपल्या समाजरचनेशी व इतिहासाशी दिसतो. घरातील मुली व विशेष गरजा असणाऱ्या मूक-बधीर अथवा गतिमंद मुलाच्या गरजांकडे बरेचदा दुर्लक्ष होताना दिसते. तर काही अल्पसंख्याक गटात दारिद्र्य व वंचितता यामुळे वातावरण बालकांच्या वाढीसाठी पुरेसे पोषक नसते.

मुलाच्या जन्मानंतर पहिल्या वर्ष-दीड वर्षात मुलाकडे एक गरजा पूर्ण करावे लागणारे शरीर म्हणून बघितले जाते. लाड केले जातात. परंतु ती एक व्यक्ती म्हणून आपल्याला काहीतरी करावे लागते हे पालकांच्या लक्षात येत नाही. त्याचे कारण कदाचित मुलांच्या अविकसित भाषेत असेल, ज्यामुळे मुले व्यक्त होऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या गरजा समजावून घेताना अडचणी येतात. किंवा अन्न, वस्त्र, निवारा, ऊब या प्राथमिक गरजांपलीकडे काही कसे द्यावे याची पुरेशी माहिती नसते.

साधारण १८ ते २४ महिन्यांमध्ये गरीब, अल्पसंख्याक मुले आणि सुस्थितीतील, मध्यमवर्गीय किंवा उच्चवर्गीय मुले यांच्या वैकासिक संपादणुकीमध्ये अंतर दिसू लागते. याचा अर्थ मध्यमवर्गीय पालकांना शिशूंच्या संगोपनाबद्दल अधिक माहिती असते असा नसून मध्यमवर्गीय मुले ज्या वातावरणात वाढतात ते अधिक पोषक असते असा आहे. दुर्बल व वंचित गटातील मुलांना जर जन्मापासून योग्य संगोपन व वातावरण मिळाले तर त्यांच्या विकासावर सकारात्मक व दीर्घकालीन परिणाम होतो.

मुलांच्या वातावरणाचा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे पालक-मूल आंतरक्रिया. यात मायेची ऊब हवी. भाषेचा सकारात्मक वापर हवा. 'हे करू नको, ते करू नको' पेक्षा 'चल आपण हे करूया' अशी भाषा हवी. आदेश देण्यापेक्षा स्पष्टीकरण देऊन सांगायला हवे. मुलांचे मत विचारायला हवे. ज्या बालकांच्या घरी 'नको-नको' किंवा 'मी सांगते म्हणून' ची भाषा असते अशा बालकांच्या शाळेत रुळण्यावर विपरीत परिणाम होतो असे आढळले आहे. ज्या मुलांच्याशी जन्मल्यापासून ३ वर्षांपर्यंत खूप गप्पा मारल्या जातात, मुलांचे ऐकून घेतले जाते, मुलांबरोबर पतंग बनवणे, चित्रे काढणे अशा विविध गोष्टी केल्या जातात, पुस्तके वाचली जातात अशा मुलांचा तिसरी-चौथीच्या टप्प्याचा भाषाविकास चांगला असतो असे सर्व वंशाच्या मुलांमध्ये सरळ आढळले आहे. म्हणूनच मुलांच्या वाढ व विकासामध्ये पालकांचा सक्रिय सहभाग हवा.

आज बालशिक्षण हवे हे सर्व पालकांना पटले आहे. ३०-४० वर्षांपूर्वी गावोगावी बालवाड्या अस्तित्वातच नव्हत्या. आज मात्र खेडोपाडीचे पालकही मुलांना लवकरात लवकर शाळेत घालायला धडपडत असतात. दुर्दैवाने त्या शाळांच्यात जे घडायला हवे ते फारसे घडताना दिसत नाही. त्यात सुधारणा होईल तेव्हा होवो. मात्र तोपर्यंत पालक व समाजाची बालकांप्रती संवेदनशीलता व सहिष्णुता वाढविण्यासाठी कार्यक्रम हाती घेता आला तर एक देश म्हणून आपल्यासाठी ते अधिक उपयुक्त ठरणार आहे.

परदेशात 'The Learning Basket' किंवा 'Family Literacy' या नावाने ० ते ३ वयोगटातील बालकांबरोबर व त्यांचा सांभाळ करणाऱ्या पालकांबरोबर काम करण्याचे प्रकल्प २० व्या शतकाच्या उत्तरार्धापासून देशभर चालू झाले आहेत. आपल्याकडे मात्र 'पोटली', 'शिक्षण आपल्या दारी', 'शिकणे मुलांचे सहभाग मोठ्यांचा' अशा लहान-लहान, संस्था पातळीवरील कार्यक्रमांमधून हे अत्यंत महत्त्वाचे व नाजूक काम शहरी, निम-शहरी व ग्रामीण भागात होत आहे. अंगणवाड्यांच्या सेविकांना मिळणारे प्रशिक्षण मात्र अजूनही प्रामुख्याने स्तनपान, आहार, आरोग्य, लसीकरण यांच्याभोवती घोटाळताना दिसते. या गोष्टी महत्त्वाच्या नक्कीच आहेत. परंतु तेवढेच पुरेसे नाही. जन्मापासून ३ वर्षांपर्यंतच्या काळात पालक व इतर सांभाळकर्त्यांना मुलांच्या विकासासाठी बरेच काही करता येते. तसेच समाज म्हणून आपलीही काही जबाबदारी आहे हे साऱ्यांनीच लक्षात घ्यायला हवे.

नुकतेच बाल-शिक्षणाचे नवे धोरण केंद्र पातळीवर जाहीर झाले. त्यावरून महाराष्ट्र राज्याने आपले धोरण बनविले आहे. दुर्दैवाने या धोरणातही जन्मापासून ६ वर्षांपर्यंतचे बालक असाच सर्वत्र उल्लेख आहे. जन्मापासून पहिल्या ३ वर्षांचे वेगळे महत्त्व धोरणातच अधोरेखित केलेले नाही. अंगणवाडी सेविकेचा शासकीय अभ्यासक्रमही या वयाला तितकेसे महत्त्व देत नाही. परंतु ही लोकशाही आहे. आणि म्हणून प्रत्येक गोष्ट करण्यासाठी सरकारची वाट न बघता आपण आपले काम करायला हवे. मुले शेवटी आपली आहेत. शासनाची नाहीत.

●●●

जगण्याचं शहाणपण

जगण्याविषयी मी जे काही शिकले ते पदवी किंवा पदव्युत्तर महाविद्यालयात नव्हे तर बाल–शाळेच्या चिखल मातीच्या, बाहुली घराच्या, रंगीत खडूंच्या खेळात. जगायचं कसं, वागायचं कसं, करायचं काय हे सारं सारं शहाणपण मी त्या बालशाळेच्या खेळात शिकले.

काय काय शिकले मी?

साऱ्या गोष्टी वाटून घ्यायच्या. तेलकट खडू, खेळातली बाहुली आणि खाऊचा डबाही. न्यायानं, नीतीनं वागायचं. मागून येऊन पुढं घुसायचं नाही. इतरांना मारायचं नाही. मुलांना, मोठ्यांना, बाहुलीला, अगदी रस्त्यावरच्या कुत्र्यालाही नाही. वस्तू जिथून घेतल्या तिथंच परत ठेवायच्या. इकडे–तिकडे अस्ताव्यस्त टाकायच्या नाहीत. पुन्हा हव्या असतील तर त्या तिथं कपाटात, शेल्फात, डब्यातच मिळतील. आपला पसारा आपणच आवरायचा. आई, ताई, मावशी यांनी नाही. आपला कचरा आपणच झाडायचा. आपले सांडलेले रंग, पाणी, आपणच पुसायचे.

आपल्या नसलेल्या इतरांच्या वस्तू घ्यायच्या नाहीत. बघायच्या असल्या तर विचारून हात लावायचा. आपल्याकडून इतरांना इजा झाली तर माफी मागायची पटकन आणि मनापासून. जेवणाआधी हात धुवायचे. शी, शू केल्यावर पाणी ओतायचं.

विचार करायचा, शिकायचं. चित्र काढायची, रंग भरायचे. गाणी गायची, नाच करायचा. रोज खेळायचं आणि कामही करायचं.

बाहेर जाताना वाहनांकडे लक्ष ठेवायचं. हात धरायचे एकमेकांचे आणि एकत्र राहायचं. नेहमी.

नळातून ठिबकणारं पाणी पिणारा पक्षी आठवतो? उन्हात संथपणे उडणारं फुलपाखरू? प्लॅस्टिकच्या कपातलं बी? या साऱ्याबद्दल वाटणारं अप्रूप? ते जपून ठेवायचं. तो पक्षी, ते फुलपाखरू, अगदी ते बी सुद्धा, सगळे मरतात. तसेच आपणही.

ते पुस्तक आठवतं? पहिल्यांदा आपला आपला वाचता आलेला शब्द? आपल्याला जे काही जाणून घ्यायचं असतं, ते तिथंच असतं, कुठंतरी.

हे सगळं अगदी आजही तितकंच खरं आहे. मी कितीही मोठी झाले तरी.

रॉबर्ट फुल्जम यांच्या
‘ऑल आय रिअली नीड टू नो आय लर्न्ड इन किंडरगार्टन’
या पुस्तकातील भागावर आधारित

स्वैर अनुवाद– मंजिरी निंबकर

बंध हवेसे!

- सूनृता सहस्त्रबुद्धे

सूनृता सहस्त्रबुद्धे यांनी बालविकास या विषयात स्कॉटलंड येथील स्टर्लिंग विद्यापीठातून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या त्या शून्य ते तीन वयोगटातील बालकांच्या वाढी – विकासासंदर्भात संस्था, शिक्षक, व पालकांना मार्गदर्शन देण्याचे काम करतात.

‘‘काय झालं?’’

‘‘बाळ रडत होतं!’’

या संवादानंतर येणारी उत्तरं ‘‘ग्राइप वॉटर द्या त्याला’’ यापेक्षा किती वेगळी असू शकतात हे बाळाच्या आसपास वावरलेल्या प्रत्येक व्यक्तीला नीटच माहीत असतं! असं कुं केलं की भूक, तसं कुं केलं की कडेवर घे, तिसऱ्या प्रकारचे कुं म्हणजे चिमणाळं हलव अशी प्रत्येक बाळाची एक स्वतंत्र डिरेक्टरी असते!

रडणं ही बाळाची संवादाची पहिली पायरी. बाळ स्वत:ची गरज, इच्छा ही त्याची काळजी घेणाऱ्या मोठ्या माणसापर्यंत पोचवत असतं. त्याचं म्हणणं समोरच्याला कळेपर्यंत परत परत सांगत असतं. समोरच्यानं रडण्याचं कारण अचूक ओळखल्याबद्दल कधी कधी हसून शाबासकीही देतं! जेव्हा रडणाऱ्या बाळाकडे मोठं माणूस लक्ष देतं तेव्हा त्या माणसाबरोबर तयार होणाऱ्या भावनिक बंधाचा पाया घातला जात असतो. ‘तू हाक मारलीस की मी ओ म्हणणार आहे!’ ही शाश्वती ज्या नात्यात बाळाला वाटू शकते त्याच नात्यात बाळाला भावनिक सुरक्षितता मिळते. आपण जसजसे मोठे होतो तसे नव्या नात्यांमधेही ही हाकेला ‘ओ’ मिळण्याची शाश्वती शोधत असतो. जर लहानपणी आपल्या अनुभवाला अशी नाती आली असतील, भावनिक सुरक्षितता आपल्याला मिळाली असेल, तर मोठेपणीही आपण अधिक पोषक नाती जोपासू शकतो. जी बाळं दुर्दैवानं अशा अनुभवांना मुकतात ती पुढे राग, अतिकाळजी, आणि नैराश्य यांना बळी पडण्याचं प्रमाण वाढतं.

बाळाच्या आयुष्यातील पहिली तीन वर्षं ही भावनिक बंधांच्या वाढीच्या दृष्टीनं सर्वात महत्त्वाची वर्षं असतात. बाळाचे त्याची काळजी घेणाऱ्या मोठ्या माणसाबरोबर हे भावनिक बंध

फोटो : अक्षय राव

फोटो : प्रथमेश अडसूळ

किती संवेदनशीलपणे बघतात त्यावर हे बंध बाळाला भावनिकदृष्ट्या सुरक्षित किंवा असुरक्षित वाटण्याचा अनुभव देतात.

‘दृढ भावनिक बंध’ हे शब्द अवघड किंवा कृत्रिम वाटले तरी त्यासाठी करायच्या गोष्टी मात्र अगदी सोप्या आणि स्वाभाविकपणे आपल्याला कराव्याशा वाटतात अशाच आहेत.

अंघोळ घातल्यावर प्रीतीची आई तिला पोटावर फुर्र फुर्र करते, मऊ टॉवेलात गुंडाळते आणि आपल्या गोडोबाचे खूप पापे घेते. आयुषचा बाबा त्याच्याशी दंगामस्ती करतो. बाबाच्या डोक्यावर टपली मारली की बाबा त्याला जवळ पकडून अजूनच खेळतो! आजोबा संध्याकाळी फिरायला जाताना आपल्या नातीला कडेवर बसवून नेमानं बरोबर घेऊन जातात. परत येईपर्यंत तिला शेजारच्या ताईकडून पापा, गल्लीतल्या छोट्या दादांकडून ‘‘बॉल खेळायला येतेस?’’ असं प्रेमळ निमंत्रण आणि कोपऱ्यावरच्या भाजीवाल्या मावशीकडून एक काकडी मिळालेली असते. यातून तिला सगळ्यात महत्त्वाची एक गोष्ट मिळालेली असते, ती म्हणजे– आपण सगळ्यांचे लाडके आहोत ही मोठेपणीही जगण्याची उमेद देणारी जाणीव. बाळाला उचलणं, कडेवर घेणं, पापे घेणं, मिठीत

घेणं या अगदी स्वाभाविकपणे आपल्याला कराव्याशा वाटणाऱ्या गोष्टी, बाळाला त्याच्यावर सगळ्याचं किती प्रेम आहे याची जाणीव करून देतात. दुसऱ्यांनी आपल्यावर केलेलं प्रेम अनुभवणं, स्वीकारणं आणि दुसऱ्यांवर आपणही माया करणं ही फार महत्त्वाची गोष्ट बाळ इतक्या लहानपणीच शिकू लागलेलं असतं.

दीड वर्षाचा सोहम शेजारचा कुत्रा जोरात भुंकल्यामुळे घाबरला आणि दुडू दुडू धावत मावशीकडे आला. मावशीनं घाबरलेल्या सोहमला पटकन कडेवर घेतलं आणि म्हणाली, ''भीती वाटली का बाबू? स्कूबीने जोरात भू भू केलं का? त्याला तुला घाबरवायचं नव्हतं काही! तो तुला हाक मारत होता!'' या साध्याशा प्रसंगामधूनच सोहमला हे कळलं की त्याला भीती वाटली तर तो त्याच्या आयुष्यातल्या मोठ्या माणसांकडे जाऊ शकतो. अशा प्रसंगामधूनच मुलांना हळूहळू सुरक्षित वाटतं आणि मोठ्यांबद्दल खात्री आणि विश्वास वाटायला लागतो.

ज्या माणसांबद्दल बाळाला अशी खात्री वाटते त्यांच्या आसपास बाळ घुटमळतं, त्यांच्या असण्याकडे लक्ष ठेवूनच कुठपर्यंत फिरत गेलेलं चालेल हे ठरवतं. जेव्हा मध्येच काहीतरी भीतीदायक प्रसंगाला (भाजीवाल्याची आरोळी किंवा कुकरची शिट्टी!) त्याला तोंड द्यावं लागतं, तेव्हा ते धावत भीती पळवणाऱ्या या खात्रीच्या माणसाकडे येतं. अशा वेळी ''यात काय आता घाबरण्यासारखं'' म्हणून न झिडकारणं हे मुलाच्या भावनिक विकासाच्या दृष्टीनं सगळ्यात महत्त्वाचं असतं. बाळाला भीती वाटते आहे ही बाब झिडकारणं म्हणजे त्याच्या भावनेचा अनादर करणं, त्याचं वास्तव नाकारणं – जे केल्यानं आपण बाळाला दुखावतो.

पाच महिन्यांच्या मीनूला आजीपाशी असलेली वाटी पकडायची होती. ती खूप हात मारत होती, सरकायचा प्रयत्न करत होती. पण हाताची आणि वाटीची गाठ काही पडत नव्हती. आजीनं मग हळूच वाटी पुढे सरकवली. दोन चार प्रयत्नांनतर मीनूनं वाटी काबीज केली आणि आपला विजय चाखून बघण्यात ती रमली! या प्रसंगात आजीनं वाटी थेट तिच्या हातात देणं का बरं टाळलं? आपल्या नातीची इच्छा आणि शारीरिक क्षमता ओळखून आजीनं फक्त हवी तितकीच मदत केल्यामुळे मीनू या 'विजया' च्या आनंदाला मुकली नाही! शिवाय पुन्हा पुन्हा प्रयत्न करत राहण्यासाठी तिला प्रोत्साहन मिळालं.

आपल्या छोटूला त्याच्या वयाला साजेसे प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करण्यासाठी वाव देणं खूप महत्त्वाचं असतं. साधं बूट घालण्याचं उदाहरण घेऊ. बूट घालायचा प्रयत्न करताना हळूहळू मुलाची चिडचिड व्हायला लागली तर आपण ''हे बघ, बुटू असे ठेवून बघूया का? आता घाल बरं पाय,'' असं म्हणण्यानं पुढच्या वेळीही तितक्याच जोमानं प्रयत्न करायची मुलाची इच्छा वाढते.

फोटो : प्रथमेश अडसूळ

धक्का लागून दूध सांडलं तर मुलाकडे ''आता? आता काय करायचं?'' असं प्रश्नार्थक पाहून बघा. तुम्हाला स्वयंपाकघरात वावरताना बघून फडकं नावाची जादुई चीज इथे कामी येईल हे कदाचित तुमच्या पिल्लाला माहीतही झालं असेल! आपल्या बाळाच्या प्रत्येक छोट्या प्रयत्नाची दखल घेणं, त्याला शाबासकी देणं त्याला खूप प्रोत्साहन देतं. कोडं खेळताना गोलात गोल बसवला की मगच फक्त द्यायला शाबासकी राखीव ठेवू नका! बराच वेळ चालणारी खुडबुडपण तितकीच महत्त्वाची आहे. प्रयत्नांसाठी दिलेली शाबासकी आपल्या बाळाला सांगत असते की, असंच करत राहा! तुला जमणार आहे! मला तुझं कौतुक वाटतंय! सकारात्मक स्व-प्रतिमा तयार होण्याकडे टाकलेलं हे पहिलं पाऊल!

दोन वर्षाच्या आसपास लहान मुलांची 'स्व' ची संकल्पना विकसित होते. दुसऱ्या कोणाबरोबरतरी खेळणी वाटून घेण्याचे प्रसंग अचानक अतिकठीण वाटू लागतात. रडारड, भांडण, ओढाओढी

पटकन सुरू होते. अशावेळी मोठ्यांनी मध्ये पडून मुलांचं लक्ष दुसरीकडे वेधून घेऊन तात्पुरता प्रसंग टाळण्यापेक्षा, असा प्रसंग सामंजस्यानं कसा सोडवायचा हे दाखवलं तर आपल्या भावनांवर ताबा कसा मिळवायचा हे मुलं हळूहळू शिकू शकतात. अशा वेळी एखादा मोठा माणूस मध्ये पडून म्हणू शकेल, ''निशाचं खेळणं तुलापण आवडलं आहे का सोनू? निशा तिचं खेळून झालं की तुला देणार आहे हं. हो की नाही निशा?'' यातलं काहीच न म्हणता रडणाऱ्या सोनूला दुसऱ्या खोलीत घेऊन गेलं तर त्याच्या भावनांची आपण खऱ्या अर्थी दखल घेत नाही. मोठे आणि बाळ यांच्या देवाणघेवाणीतून जसं बाळ नात्याबद्दल शिकतं, तसंच मोठे इतरांशी कसं वागतात याचंही बाळ निरीक्षण करत असतं. कोण कधी हिरमुसतं, कोणाच्या कपाळावर पटकन आठी येते हे बाळ बघत असतं. मोठ्यांच्या चेहऱ्याची प्रत्येक रेष बाळाला काहीतरी सांगत असते, शिकवत असते.

बाळ जसजसं मोठं होऊ लागतं तसतशा स्वतःच्या गरजा स्वतःच पूर्ण करायचा प्रयत्न करतं. भरवताना आपल्या हातातून चमचा काढून स्वतःचं स्वतः खाण्याचा प्रयत्न करणाऱ्या आपल्या बाळाला आपण कितीदा आनंदानं ते करू दिलं आहे आठवा बरं! जर आपण हे मान्य केलं की बाळ यातून एक जीवनोपयोगी कौशल्य शिकणार आहे, शिवाय स्वावलंबी होण्याकडे पाऊल टाकल्यामुळे त्याला समाधान मिळणार आहे, त्याचा आत्मविश्वास वाढणार आहे तर वाटीतून सांडलेला खाऊ उचलण्याचं काम खरंच इतकं कष्टाचं वाटेल का?

बाळ दिवसभर नजरेसमोर असणं आणि त्याच्याकडे आपलं लक्ष असणं यात फरक आहे. जेव्हा आपलं त्याच्याकडे लक्ष असेल तेव्हा त्याला काय शिकायचं आहे, काय करायचं आहे हे आपल्याला नीट समजेल. मला आपापलं खाऊन बघायचं आहे, असं त्यानं म्हटलेलं मग आपल्याला ऐकू येईल आणि आपण त्याचा चमचा न हिसकावता त्याला प्रयत्न करू देऊ. यालाच इंग्रजीमधे रिस्पॉन्सिव्ह केअर असं म्हणतात.

''बाळाला तुमचं त्याच्यावर प्रेम आहे हे वेगवेगळ्या मार्गांनी कळू द्या,'' अशा सल्ल्याला पालकांचा एक प्रतिप्रश्न असतो– ''आमचं मूल मग जास्तच लाडावलं नाही का जाणार?'' प्रत्येक वेळी कुरकुर केल्यावर त्याला उचलून घेतलं तर ते हट्टी नाही का होणार? इथं हे समजून घेणं महत्त्वाचं आहे की मुलावर माया करा म्हणजे त्याची प्रत्येक इच्छा पूर्ण करा, त्याला मनासारखं वागू द्या असा उथळ अर्थ इथे अभिप्रेत नाही. तर प्रत्येक वेळी ''मला कळलं आहे तू काय म्हणते आहेस ते, ऐकलं आहे मी'' हे मुलांपर्यंत पोचणं महत्त्वाचं.

काही उदाहरणं बघूया. काही बाळांना कपडे बदलायला आवडत नाहीत. बाळ मग रडण्यातून जोरदार निषेध नोंदवेल. त्यावेळी आई जर म्हणाली की, ''मनूला आवडत नाही ना फ्रॉक बदलायला? पण आपण छान छान अंगा घालून भुर्र जायचं आहे! मग एका मुलीला मज्जा येणार आहे!'' तर बाळाला जरी आईचे शब्द

फोटो : अक्षय राव

समजले नाहीत तरी ज्या शांत आश्वासक स्वरात ती बाळाशी बोलेल त्यातून बाळाला हे कळेल की आईपर्यंत माझं म्हणणं पोचलं आहे. ती माझ्यासाठी आहे. निरांजनाला हात लावू दिला नाही म्हणून रडणाऱ्या बाळाला आपण म्हणू शकू, ''आवडलं नाही तुला निरांजन दिलं नाही ते? हो ना? पण ते हा असतं! बाऊ होतो त्यानी बाबू!'' स्वरातला शांतपणा, मी आहे ही भावना बाळाला खूप मदत करते. संशोधन आपल्याला आता असं सांगतं की आपण बाळाच्या रडण्याची प्रत्येक वेळेला, 'ऐकू आलं आहे मला तू काय म्हणतो आहेस ते, आहे हं मी,' अशी दखल घेऊ शकलो तर त्याचा मुलाच्या भावनिक विकासावर चांगला परिणाम होतो.

आपल्या बाळाची भावनिक वाढ चांगली व्हावी यासाठी पोषक वातावरण तयार करताना लागणारी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे वेळेची गुंतवणूक. आपल्या मनात बाळाबद्दल असणारं भरपूर प्रेम त्याला अनुभवायला मिळायलाच हवं आणि त्यासाठी त्याला आपला सहवास हवा. शांतपणे बाळाबरोबर लोळत पुस्तक बघता येणारे, गॅलरीतून चिऊ बघायला जायचंय म्हणून लॅपटॉप बाजूला ठेवता येणारे, आपला वेळ वाया जातो आहे असं न वाटता ओला लंगोट बदलता येणारे, फक्त नवीन खेळणी न आणता प्रत्यक्ष खेळायला वेळ काढणारे, रोज संध्याकाळी बागेत जायचं असतं म्हणून ऑफिसातून वेळेवर घरी येणारे आई बाबा खरे 'श्रीमंत'! आत्ता साध्याशा वाटणाऱ्या या गोष्टींसाठी वेळ काढू शकलात तर तुमच्या बाळाला आयुष्यभर पुरेल असा समृद्ध भावनिक पाया बांधण्यात तुम्ही गुंतवणूक कराल. त्याच्या नावे ठेवलेल्या कुठल्याही पॉलिसीपेक्षा ही गुंतवणूक सगळ्यात जास्त रिटर्न्स देईल हे नक्की!

सूनृता सहस्रबुद्धे
soonrita@gmail.com
9423174047

या लेखातील सर्व छायाचित्रे पालकांच्या परवानगीने वापरण्यात आली आहेत.

आदित्य- कहाणी एका लढ्याची

- राजश्री काकडे, स्वाती कदम

राजश्री काकडे व स्वाती कदम या गेली २ वर्षे 'शिक्षण आपल्या दारी' या प्रगत शिक्षण संस्थेच्या प्रकल्पाअंतर्गत ० ते ३ वयोगटातील मुलांसोबत काम करीत आहेत. गृहभेटी, शेजारसभा व पालकसभांच्या माध्यमातून या वयोगटातील मुलांच्या पालकांना योग्य ती माहिती, कौशल्ये व साहित्य देऊन आपल्या पाल्याचे पहिले शिक्षक होण्यासाठी सक्षम बनविण्याचे काम त्या करतात.

सकाळी ११-११.३० ची वेळ. राजवैभव थिएटरच्या कुंपणाच्या भिंतीला लागून असणाऱ्या गटारावर टाकलेल्या फरशांवरून आम्ही चालत चाललो होतो. एका बाजूला वेड्या बाभळीची झाडी होती. दोन डुकरिणी आपली पिलावळ पोटाशी घेऊन तिथे लोळत पडल्या होत्या. आमच्या सर्वेक्षणातल्या शेवटच्या घरी आम्ही पोचलो.

दोन खोल्यांचे पत्र्याचे घर होते. जमिनीपासून जरा उचलून घेतले होते. समोर एक अंगण. त्यात दोन-तीन मोठी पिंपे पाणी भरून ठेवलेली. एक नळ कनेक्शन. भोवती कमरेएवढी भिंत होती. समोरच्या खोलीत एका खाटेवर आदित्य दुपटयावर पडला होता. समोर आजी टीव्ही बघत होती. आदित्यची आई स्वयंपाक करीत होती. काकू मुलांचे आवरत होती. आम्ही आल्याचे पाहून आजींनी विचारले, ''कोण पाहिजे?'' आम्ही संस्थेचे नाव सांगितले. आमची ओळख करून दिली. 'शिक्षण आपल्या दारी' या प्रकल्पाअंतर्गत आम्ही सर्व्हे करायला आलो आहोत असे सांगून तुमच्या मुलाचे नाव देता का म्हणून विचारले. आजींनी आदित्यच्या आईला हाक मारली. त्या हात पुसत बाहेर आल्या. ''इतक्या लहान मुलाला तुम्ही काय शिकवणार?'' त्यांनी विचारले. ''आम्ही त्याच्याबरोबर खेळणार. गाणी म्हणणार. गप्पा-गोष्टी करणार. आणि तुम्हालाही बालकांच्या

वाढ, विकास, आहार व आजारपणाबद्दल सांगणार,'' आम्ही म्हटले. त्यावर त्यांनी बाळाचे नाव सांगून फॉर्ममधील माहिती भरून दिली.

आदित्यच्या घरी आम्ही आठवड्यातून एकदा गृहभेटीला जायला लागलो. दुसऱ्या वेळी आम्ही आदित्यच्या घरी गेलो तेव्हाही आदल्या आठवड्यापेक्षा चित्र फारसे वेगळे नव्हते. आदित्य दुपटयावर झोपला होता आणि घरातील बाकी सगळी मंडळी आपापल्या कामात गुंग होती. आम्ही आत गेल्या गेल्या आदित्यशी गप्पा मारायला सुरुवात केली. खुळखुळा वाजवून दाखवला. नंतर एकदा डावीकडे व एकदा उजवीकडे खुळखुळा वाजवून मान वळवायला लावली. तोपर्यंत आई आली. आदित्यसमोर टांगणाळे धरले तर तो हात लांबवून त्याला हात लावायचा प्रयत्न करू लागला. आम्ही पालथ्या पडणाऱ्या मुलाचे कार्ड दाखवून आईला आदित्यबरोबर एक-दोन कृती करायला सांगितल्या. आईने तुटकपणे सांगितले की त्याच्या वयाच्या इतर मुलांसारखे तो काहीच करीत नाही. त्याच्यात एक गुणसूत्र जास्त आहे. आम्ही म्हटले, ''आता जरी नाही केले तरी करेल हळूहळू. आपण प्रयत्न करीत राहायचे. म्हणून खुळखुळा नसेल तर वाटी-चमच्याने आवाज करून लक्ष वेधून घ्या, त्याच्याशी बोलून त्याची नजर धरून ठेवण्याचा प्रयत्न करा, रंगीत कापडाचे पिळे डोक्यावर धरून हलवून पकडायला प्रोत्साहन द्या, त्याला नावाने हाक मारा, स्वयंपाकघरात असलात तरी त्याच्याशी नाव घेऊन बोलत रहा, काम करता करता मध्येच बाहेर येऊन त्याची पापी घेऊन जा,'' अशा काही कृती आठवडाभर करायला सांगून आम्ही तेथून बाहेर पडलो.

तीन महिन्याचा आदित्य अजून ओळख दाखवत नव्हता. पालथा पडत नव्हता. शिवाय त्याची आई म्हणालेली की त्याला एक गुणसूत्र जास्त आहे म्हणून. आम्हाला काही कळेना. तसा याआधी न चालणाऱ्या अडीच वर्षाच्या मुलाचा आम्हाला अनुभव होता. डॉक्टरांनी सांगितले आहे की तो उशिरा चालेल म्हणून घरी कोणी काही प्रयत्नच करीत नव्हते. आम्ही खेळणे दूर ठेवून त्याला उभे राहायला, भिंतीला धरून चालायला प्रोत्साहन दिले. ''कुठलीच गोष्ट त्याला त्याच्या जागेवर नेऊन द्यायची नाही. त्याला बोलवायचे

किंवा जाऊन घे असे सांगायचे,'' असे सांगून घरच्यांनाही प्रयत्न करायला सांगितले. त्यानंतर तीनच महिन्यात तो चांगला चालायला लागला. त्यामुळे प्रयत्नांवर आमचा अगदी विश्वास होता. शिवाय चालत येण्याचे कष्ट घेऊन मिळवावेसे वाटतील असे खेळ आमच्याकडे आहेत. त्यामुळे आदित्यला आपण मदत करू शकू असा विश्वास आम्हाला वाटत होता.

आम्ही आदित्यच्या आईकडून सगळी कागदपत्रे घेऊन आमच्या प्रकल्प-प्रमुखांना दाखवली. त्या डॉक्टर आहेत. त्यांच्याकडून आदित्यची परिस्थिती समजून घेतली. आदित्य मंगोल बेबी आहे. शिवाय त्याला क्रेटीनिझमही होता. त्यावर औषधोपचार सुरू होता. परंतु डॉक्टरांनी सांगितले होते की हा मतिमंद असेल. आई तर पार खचली होती. थोरली मुलगी. तिच्या पाठीवर ६ वर्षांनी मुलगा झाला म्हणून खूप आनंद झाला होता. बाळाचे पोट खूप मोठे वाटत होते. तशी तक्रार केल्यावर डॉक्टर म्हटले की पालथा पडायला लागल्यावर कमी होईल म्हणून. आदित्यला सारखी सर्दी होत असे. म्हणून त्याला बालरोगतज्ज्ञांकडे नेल्यावर तपासण्या झाल्या व क्रेटीनिझमचे निदान झाले. थायरॉक्सिनची मात्रा सुरू झाली. तपासणीत इतरही काही लक्षणे दिसली. आणखी तपासण्या झाल्यावर २१ व्या गुणसूत्राच्या दोनाच्या जोडीऐवजी तीन गुणसूत्रे असल्याने मंगोलिझम असल्याचेही निष्पन्न झाले.

पाचव्या महिन्यात आदित्य नजरेला नजर देऊ लागला.

हसायला लागला. त्या दिवशी त्याची आई दारात आमची वाट पाहात उभी होती. आदित्य काय करतोय पाहा म्हणत ती आम्हाला आत घेऊन गेली आणि आदित्यला हाक मारली. आदित्यने मान वळवून आईकडे पहिले आणि तो बोळके पसरून हसला. आईचा आणि आमचाही जीव सुपायेवढा झाला. त्या दिवसापासून आदित्यने आणि त्याच्या आईने पुन्हा मागे वळून पाहिले नाही. आदित्य अजून पालथा पडत नव्हता. आम्ही त्याच्यासमोर बॉल तिरपा धरला. तो घेण्यासाठी त्याने हात पुढे केला आणि आपसूक कुशीवर झाला. त्याच्या अंगाखाली अडकलेला हात आम्ही सरळ केला तेव्हा तो पालथा झाला. पालथे पडल्यावर बाळाची दुनियाच बदलून जाते. तशी त्याची बदलली. दुपट्यावरची फुले, फुलपाखरे, ठिपके बघून ती तो हाताने खरवडू लागला. आदित्यला सातवा महिना लागला, तशी आम्ही त्याला पालथा टाकून समोर खेळणी ठेवू लागलो. आता

त्याची नजर स्थिर होत होती. त्यामुळे तो रंगीत बॉल, मऊ खेळणे घ्यायला हात पुढे करू लागला. हाती लागले नाही तर पुढे सरकण्याचा प्रयत्न करू लागला. दुधाबरोबर आता तांदूळ व मूगडाळ भाजून दळलेल्या रव्याची सरबरीत खिचडी, पिकले केळे, शिजलेला बटाटा असे खाणे सुरू केले. आम्ही सांगायचा अवकाश, आई ते लगेच अमलात आणी.

एक दिवस आम्ही त्याच्यासमोर ३-४ खेळणी टाकली होती. त्याने त्यातला मऊ बॉल उचलला. आम्ही त्याला सांगितले, ''आदित्यने मऊ बॉल घेतला. तो दाबून बघ, कसा मऊ मऊ आहे.'' आम्ही त्याला हाताने बॉल दाबण्याची कृती करून दाखवली. तशी त्याने पण बॉल दाबला. पुढच्या वेळी त्याला मऊ बॉल कुठे आहे विचारल्यावर त्याने लगेच तिकडे बोट दाखवले व हाताने दाबायची कृती केली. आम्ही त्याच्या आईला हे दाखवून सांगितले की आदित्य जे काही करेल त्याविषयी तुम्ही त्याच्याशी बोला. त्याचे लक्ष असते. त्यातूनच त्याचा भाषा विकास होईल.

आता आदित्य प्रतिसाद देऊ लागला होता. त्यामुळे १० वर्षांची दिदीही त्याला 'इथे इथे बस रे मोरा' शिकवू लागली. कॅसेट

टाकून डान्स करण्याचा कार्यक्रमसुद्धा आदित्यच्याच खोलीत होऊ लागला. झोपल्या-झोपल्या तो हात नाचवायला शिकला. त्याला उभा धरला तर तो गाण्याच्या तालावर पायही नाचवे. आदित्यने कुठलीही नवी गोष्ट केली की सगळे आम्हाला सांगायला धावत. सगळे येता-जाता त्याच्याशी बोलायला लागले होते. तो ८-९ महिन्याचा असताना ''आरशातलं बाळ किती छान दिसतंय, बघ'' म्हणून त्याला आम्ही आरसा दाखवला. तो खूप हसून त्या प्रतिबिंबाला प्रतिसाद देत होता.

१ वर्षाचा झाल्यावरही आदित्य अजून बसत नव्हता. आम्ही त्याला पायाचा घेर करून टेकवून बसवा असे सांगितले. पुढच्या आठवड्यात गेलो तर आदित्यला स्वयंपाकघरात एका पातेल्यात बसवले होते. तोही मजेत बसून बिस्किट खात होता. खरे तर आम्ही एकेका मुलाकडे ६ महिनेच जातो. परंतु आदित्यची केस वेगळी होती आणि त्याला व त्याच्या घरच्यांना आधाराची गरज होती. म्हणून तो २ वर्षांचा होईपर्यंत आम्ही त्याच्याकडे जात राहिलो. पहिले वर्ष दर आठवड्याला जात होतो. त्यानंतर दर १५ दिवसांनी किंवा महिन्यातून एकदा जात असू.

आदित्यला त्याचे पालक कधी कुठे बाहेर घेऊन जात नसत. का तर तो इतर मुलांपेक्षा वेगळा दिसतो म्हणून त्यांना लाज वाटे. आदित्यचे वडील त्याच्या मंगोल बेबी असण्याबद्दल आईला दोष देत. एकदा आमच्या प्रकल्प-प्रमुखांशी आम्ही त्यांची भेट घडवून आणली. तेव्हा आईच्या अंडपेशीचे फलन झाल्यावर गुणसूत्रांच्या २३ जोड्यांपैकी एकविसाव्या जोडीत दोन ऐवजी तीन गुणसूत्रे राहतात व त्यामुळे ते मूल इतरांपेक्षा वेगळे होते हे आमच्या ताईंनी समजावून सांगितले. त्यात आईचा आहार, आजारपण, औषधे या कशाचाच संबंध नसतो. जगात अशी अनेक मुले असतात. त्यांच्या विकासासाठी सुरुवातीपासून प्रयत्न केले तर ती स्वतःची सर्व कामे स्वतः करू शकतात. तसेच पोटापाण्यासाठी इतरही काही काम करू शकतात. असे सर्व सांगितल्यावर तेही आदित्यबरोबर वेळ घालवू लागले. आदित्य मुळातच हसरे बाळ असल्याने लवकरच बाप-लेकाची दोस्ती जमली.

आई आदित्यला जेवण भरवत असे. फक्त पोळी, केळे, बिस्किट असा कोरडा खाऊ तो हाताने खाई. त्याच्यासमोर ताट ठेवा. त्याला हाताने जेवू द्या, असे सांगितल्यावर आई म्हणाली फार राडा करतो तो. आम्ही दर भेटीत आग्रह करीत असू. शेवटी त्याला हाताने खाण्याची परवानगी मिळाली. बाबा त्याला आपल्याबरोबर जेवायला घ्यायला लागले. आज अडीच वर्षांचा आदित्य हाताने जेवतो. शेजारच्या ३ वर्षाच्या मुलाला मात्र त्याची आई मागे पळून पळून चारत असते, असे आदित्याची आई हसत हसत सांगत होती.

एक दिवस आदित्यकडे गेलो तर आम्हाला बघून तो कपाटातून बाहेर पडला. त्याने कपाटातले सगळे कपडे बाहेर काढून टाकले होते आणि त्याजागी आपण कपाटात चढून बसला होता. त्याच्या या साऱ्या बाललीलांचे घरी मोठे कौतुक होत होते.

आदित्यच्या दुसऱ्या वाढदिवसाला आम्हाला निमंत्रण होते. पण आम्हाला त्या दिवशी जायला जमले नाही. दुसऱ्या दिवशी गेलो तर आई म्हणाली तुम्हाला गंमत दाखवते. म्हणून तिने आदित्यला पलंगावर चढायला सांगितले. तशी तो रांगत रांगत पलंगापाशी गेला आणि पलंगाखाली पांघरुणे ठेवायला केलेल्या कपाटाची फळी पाडून त्याच्यावरून पलंगावर चढला होता. पलंगावर चढण्याची समस्या सोडविण्याइतका त्याच्या मेंदूचा विकास निश्चितच झाला होता हे आम्हाला कळले व आम्ही त्याच्या आईवडिलांच्या ते लक्षात आणून दिले.

आदित्यचे कुटुंब आता गावाबाहेर शेत-जमीन घेऊन तिकडे राहायला गेले आहे. तेथील मोकळ्या स्वच्छ हवेत, मातीच्या सहवासात त्याचा कारक विकास चांगलाच वेगाने चालू आहे. आता तो पळतो. त्याचे बोलणे मात्र अजून खूपच मर्यादित आहे. अडीच वर्षांचा आदित्य काका, गाय असे ५-६ शब्द बोलतो. बाकी सगळे खुणेने चालू असते. समज त्या मानाने चांगली विकसित झाली आहे. आईला मिठाची बरणी आणून दे, चड्डीला साबण लाव अशी मदत पण तो करतो. गावात आई आणि काकू कामे वाटून घेत. शेतावर आता आईला एकटीलाच सगळी कामे करावी लागतात. त्यामुळे आदित्य स्वतःच साबण लावून अंघोळ करतो. हाताने पाणी घेऊन पितो. स्वतः जेवतो आणि दातही घासतो. आदित्यची आई गावात आली की आवर्जून आमच्या ऑफिसला येते. अडीच वर्षांपूर्वी तुम्ही भेटला नसता तर आम्ही काय केले असते म्हणता म्हणता तिचे डोळे पाणावतात.

राजश्री काकडे

rajeshreekakade46@gmail.com
8421513360

स्वाती कदम

meswatisantosh@gmail.com
9860344243

शब्दांकन: मंजिरी निंबकर
प्रकल्प-प्रमुख, शिक्षण आपल्या दारी

शिशूंना उद्दीपन

- सुषमा साठ्ये

सुषमा साठ्ये या एस. एन. डी. टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, पुणे येथे मानव-विकास विभागात व्याख्याता आहेत. तसेच त्या ० ते ३ वयोगटासोबत काम करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या पोटली प्रकल्पाच्या मास्टर ट्रेनरही आहेत. गेली २३ वर्षे त्या पूर्व प्राथमिक शाळेतील मुलांसोबत काम करीत आहेत.

जन्मानंतर पहिले दोन आठवडे सोडल्यास दोन वर्षापर्यंतच्या काळाला शैशवावस्था असे म्हणतात . १५ दिवस ते दोन वर्षे ह्याला इंग्रजीत Infancy असे म्हणतात. त्याचा मूळ अर्थ बोलता न येणे असा होतो मात्र शैशवावस्थेच्या शेवटी मुलांना छोटी छोटी वाक्ये बोलता येतात. सुरुवातीला पूर्ण असहाय्य असलेले मूल या अवस्थेच्या शेवटी खूप स्वावलंबी झालेले दिसते .

या अवस्थेत वाढ व विकास जलद गतीने होत असतो. शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकासाचा पाया घातला जातो. या वयात मुलांना जे जे चांगले वा वाईट अनुभव येतात आणि ज्या प्रकारे त्यांची काळजी घेतली जाते त्याप्रमाणे त्यांच्यामध्ये विश्वासाची भावना आणि भावनिक अभिवृत्तीचा विकास होतो म्हणजेच व्यक्तिमत्व विकासाचा मूलभूत पाया इथे तयार होतो .

आई, बाबा आणि बाळाची काळजी घेणाऱ्या व्यक्ती मुलांच्या विकासाला खूप मदत करू शकतात. मुलांच्या विकासाला उत्तेजन देणारे वातावरण निर्माण करू शकतात, त्याला प्रोत्साहन देऊ शकतात . छोट्या बाळांना त्यांच्या पालकांकडून प्रेमाची ऊब आणि उद्दीपन मिळाले तर त्यांचा विकास वेगाने आणि चांगला होतो.

शैशवावस्थेतील उद्दीपन म्हणजे मुलांच्या प्रारंभिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पालकांनी आणि लहान मुलांची काळजी घेणारे इतर यांनी त्या बाळाला आजूबाजूची परिस्थिती जाणून घेण्याची संधी, प्रोत्साहन आणि स्वातंत्र्य दिले पाहिजे. त्यासाठी त्यांच्या डोळ्यांचे, कानाचे, स्पर्श संवेदनांचे उद्दीपन करणाऱ्या वेगवेगळ्या वस्तू मुलांच्या अवतीभोवती, त्यांना सहज दिसतील किंवा हाताने घेता येतील अशा ठेवल्या तर त्या जास्त परिणामकारक ठरतात आणि त्याचबरोबर मुलांना आईचे प्रेम, विश्वास जाणवायला लागून सुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्यामुळे बाळाचा आत्मविश्वास वाढतो, बाजूचे वातावरण जाणून घेण्याची तयारी होते म्हणजे बाळाची जिज्ञासा वाढते आणि त्यातूनच त्याची जाणीव व ज्ञान वाढते.

सुरुवातीच्या काळात मुलांना तेल लावून अंग चोळणे, थोपटणे याचा उपयोग होतो. भारतात जवळजवळ सर्व ठिकाणी बाळाला अंघोळ घालण्यापूर्वी तेल लावून अंग चोळण्याची किंवा रगडून काढण्याची पद्धत आहे. त्यामुळे पूर्ण शरीराचे उद्दीपन होते. शिवाय चोळताना आई किंवा चोळणारी व्यक्ती बाळाशी बोलते, त्याच्याकडे बघून गाणे म्हणते आणि ते बघून बाळ प्रतिसाद देते. अशा प्रकारच्या उद्दीपनाचा वाढीवर चांगला परिणाम होतो हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. मुलांना वेगवेगळ्या प्रकारचे आवाज ऐकवणे, गाणी म्हणणे, गाणी म्हणताना कृती करणे, आवाज करणे उदा . मांजर आली म्यांव म्यांव हेही महत्त्वाचे असते.

शिशूंना वेगवेगळ्या प्रकारची उद्दीपने मिळावीत यासाठी काय करावे ?

दृश्य उद्दीपन

१) पाळण्याला रंगीबेरंगी चिमणाळे टांगणे
२) रंगीत खुळखुळे वापरणे
३) मुलांना कडेवर घेऊन विविध रंगीत वस्तू दाखवणे जसे की प्राणी, पक्षी, आकाश, अवतीभवतीचा परिसर, माणसे इत्यादी
४) थोडे मोठे झाले की सगळे अवयव आरशात दाखवून बाळाची स्वत:ची ओळख करून घेणे

आवाज उद्दीपन

१) खुळखुळा वाजवून दाखवणे
२) भांडी, चमचे, खेळणी असे विविध आवाज ऐकवणे
३) बाळाशी बोलणे
४) गाणी म्हणणे, अंगाई गीत, हावभाव व आवाज काढून गाणी म्हणणे

स्पर्श उद्दीपन

१) वेगवेगळे स्पर्श करायला लावणे
२) वस्तू हातात धरायला देणे
३) खरखरीत, गुळगुळीत स्पर्श देणे
४) खेळणी ओढायला, ढकलायला देणे
५) कागद खेळायला, फाडायला, चुरगळायला देणे
६) एकमेकांचा हात हातात धरणे
७) पाण्यात बसवणे, हात पाय हालवू देणे

रुची उद्दीपन

१) बाळ थोडे मोठे झाल्यावर (९ महिन्यांचे) त्याला बोटात पकडता येऊ लागले की बशीत खायच्या वस्तू हाताने खायला देणे
२) गोड, आंबट, खारट अशा सगळ्या प्रकारच्या चवी देणे

(पान १३ वर)

मुलांमधील वाढती आक्रमकता आणि आपण

- गिरिजा तुळपुळे

गिरिजा तुळपुळे गेल्या ८ वर्षांपासून सामाजिक क्षेत्राशी संबंधित आहेत. मुलांच्या शिक्षण व सामाजिकीकरणासंदर्भातील प्रश्नांमध्ये त्यांना विशेष रस आहे. समाजकार्य व सामाजिक धोरणाच्या अभ्यासक्रमातूनही त्यांनी या विषयाचा अभ्यास केला आहे. मुंबईमधील मासूम संस्थेच्या माध्यमातून त्यांनी रात्रशाळांच्या मुलांबरोबर काम केले आहे.

प्रफुलने शाळेच्या गेटबाहेर गल्लीमधल्या मंडळवाल्या पोरांशी मारामारी केली. मी शाळेत गेले तेव्हा मुख्याध्यापक त्याच्याशी बोलत होते. मंडळवाली पोरे प्रफुलला वडिलांच्या दारू पिण्यावरून काहीतरी बोलली होती. सरांसमोरही त्याला राग आवरत नव्हता. शिक्षक त्याला घरी घेऊन गेले. असे किस्से शाळेत वारंवार घडत असावेत. रात्रशाळेच्या मुलांबरोबर काम करताना त्यांच्या जगाशी संपर्क येत होता थोडा थोडा. वर्गामध्ये शिक्षकांना येत असलेले प्रश्न, विशेषतः attention span आणि नियमनाचे, सोडवायला मदत शोधताना मुलांच्या कथा ऐकायला मिळाल्या. कोणी सहलीला येताना दारू पिऊन मारामारी केली, कोणाला मिरवणुकीत दंगा केला म्हणून आत टाकलाय, इत्यादी. आता टीनेजर्स असलेली ही मुले ज्या वर्तन समस्या दाखवत होती त्यांची पाळेमुळे खूप खोलवर गेलेली आहेत आणि ती वेगवेगळ्या वयांमधल्या गरजा अपूर्ण राहिल्याची लक्षणे आहेत हे तर स्पष्टच दिसत होते.

मुलांमधल्या वाढत्या हिंसक प्रवृत्तींबद्दलचा अभ्यास वाढतो आहे. पाश्चिमात्य देशांमध्ये असा सैद्धांतिक अभ्यास जास्त झालेला सापडतो. केनेथ डॉज या अभ्यासकाने मुलांमधील हिंसकतेची सुरुवात मूल पोटात असतानाच्या आईच्या आरोग्य आणि आनंदावर अवलंबून असते असे मांडले आहे. त्यानंतर वयाच्या पहिल्या वर्षातला असुरक्षिततेचा किंवा आपण नकोसे असण्याचा अनुभव (हे खूपच टोकाचे शब्द झाले. पालकाकडून वेगवेगळ्या प्रमाणात झालेल्या दुर्लक्षाचे त्याच प्रमाणात झालेले परिणाम असे आपण म्हणू शकतो) मुलांच्या आक्रमकतेमधे भर पाडतो. उदाहरणादाखल एक प्रयोग ऐकण्यात आला होता. या प्रयोगामध्ये ० –१ वर्षे वयाच्या मुलांसोबत त्यांच्या पालकांना वेगवेगळ्या खोल्यांमध्ये ठेवण्यात आले. एका मुलाबरोबर एक पालक अशा २ तासाच्या सहवासानंतर पुढचा दिवसभर या मुलांची निरीक्षणे नोंदवण्यात आली. जे पालक मुलांच्या डोळ्यात डोळे घालून त्यांच्याशी बोलले होते, त्यांच्या हाकांना ओ देत होते ती मुले आनंदी आणि इतरांना सहकार्य करण्यास उत्सुक दिसली. याउलट मुलांकडे दुर्लक्ष केलेल्या किंवा त्यांच्या हाकांना वैतागाने उत्तर देत असलेल्या पालकांच्या मुलांनी तत्काळ वाढलेला चिडचिडेपणा आणि आक्रमकता दाखवली. हा एक छोटा प्रयोग असला तरी मुलांच्या घरातल्या, कुटुंबातल्या वातावरणाचा मुलांच्या मनामधल्या सुरक्षिततेच्या भावनेवर, आणि पर्यायाने स्वभावातील अविश्वास आणि आक्रमकता यांवर विशेष परिणाम होतो असे बऱ्याच संशोधनांमधून पुढे आले आहे. रॉल्फ लोबेर आणि डेल हेय यांनी नमूद केले आहे की जसजसे मुलांचे उर्वरित जगाशी संपर्क वाढत जातात, तसतशा आक्रमक वृत्ती अधिकाधिक वाढू लागतात. नवीन नाती बनवण्यासाठी जो विश्वास आणि सुरक्षिततेची भावना मनात रुजलेली असावी लागते ती अगदी लहानपणी पक्की झाली नसेल तर नवीन लोकांना मुले सर्व्हायव्हल (survival) प्रतिक्रिया देतात. याच काळात कुटुंबाकडून आणि निकटवर्ती समाजाकडून वेगवेगळ्या प्रकारच्या धोक्यांना (threats) कोणती प्रतिक्रिया योग्य आहे, हेही ती शिकत असतात. लहान वयात तयार झालेली मनातील असुरक्षितता आणि प्रतिक्रियांची अयोग्य समज यांचे थरावर थर वाढत्या वयानुसार बसत राहतात आणि पर्यायाने सहकार्य न करण्याची वृत्ती (defiant behaviour) आणि हिंसक वागणूक गडद होत जाताना दिसते.

लहान मुलांच्या स्वभावातील आक्रमकता ही दोन ठिकाणांहून निर्माण होते असे मानले जाते, अंत:प्रेरणा आणि संस्कारित प्रेरणा. अंतःप्रेरणा (instinct) म्हणजे मुलांमधे जन्मजात असलेली धोक्याची समज. सगळ्या प्राण्यांच्या पिल्लांमधे ती असते. बोक्यापासून पळून जायला किंवा पोट दुखल्यावर हरळी चावायला मांजरीची पिल्ले आपोआप शिकतात पण शिकार करायचे शिक्षण मात्र आई देते. माणसाची मुलेही पालकांव्यतिरिक्त लोकांवर विश्वास ठेवायला आपोआप शिकत नाहीत. पालकांकडून मिळालेल्या अनुभवांवरून त्यांच्या विश्वास आणि सुरक्षितता या संदर्भातील अंतःप्रवृत्ती निर्माण होतात. संस्कारित प्रवृत्ती मात्र ती सभोवतालच्या वातावरणातून (environment) शिकतात. नवीन माणसांपैकी कोण विश्वासपात्र आहे आणि कोण नाही याची निवड, हुशार मुलांकडून धोका आहे की शक्तिवान मुलांकडून, आपण लागल्यावर रडलो तर चालते की मनाने दुखावल्यावर असे अनेक निर्णय मुले संस्कारित प्रवृत्तीतून घेतात. या टप्प्याला पालक आणि इतर जवळच्या लोकांच्या धारणांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडतो.

तेव्हा मुलांच्या स्वभावातील आक्रमकता आणि हिंसाही प्रामुख्याने त्यांची धोक्याची (threats) आकलन क्षमता आणि त्यांवरच्या प्रतिक्रिया यांनी बनलेली असते आणि असा एकंदर अभ्यासकांचा रोख असला, तरी या धोक्यांची ओळख किंवा समज ही संस्कारित प्रेरणेबरोबर विकसित होत असते. यात प्रत्यक्ष अनुभवांचा जितका वाटा असतो, तितकाच पूर्वग्रहांचा (biases)

देखील असतो. म्हणजेच पूर्वग्रह आणि त्यापाठोपाठ येणारी असहिष्णुता शिकून मुले धोके व त्यांना पूरक प्रतिक्रियांची समज बनवणार असतात. हे पूर्वग्रह कितीतरी प्रकारचे असतात. आपल्या लक्षातही यायचे थांबलेले पूर्वग्रह आपण मुलांमध्ये संक्रमित करत राहतो. माझी एक सहकारी तिच्या दोन वर्षांच्या भाच्याला अनोळखी, विशेषतः हिंदी बोलणाऱ्या, दाढी असलेल्या लोकांपासून सांभाळून राहायला सांगत होती. मुंबईमध्ये उत्तर भारतीयांबद्दल विशेषतः यू पी – बिहारकडून आलेल्या मुस्लिम कुटुंबांबद्दलचे पूर्वग्रह अणि असहिष्णुता ही आमच्या पिढीला नवीन होती पण पुढच्या पिढीकडे ती फारच सहज संक्रमित होताना दिसते आहे. अगदी लहान मुलांपर्यंत भाषिक किंवा प्रांतिक द्वेष पोहोचताना दिसतो आहे.

असेच दुसरे उदहारण म्हणजे, सध्या मुलांमधे प्रचंड लोकप्रिय असलेले छोटा भीम हे कार्टून. भारतीय बनावटीचे, ओळखीच्या संस्कारांचे हे कार्टून बघण्यापासून आई-वडीलही मुलांना सहसा थांबवत नाहीत. कार्टूनचा हीरो भीम, हा गोरागोमटा, कद नेसणारा, गंध लावणारा आणि सोन्याचे कडे घालणारा मुलगा आहे. एका एपिसोडमध्ये भीमच्या नेतृत्वाखाली गावातले सगळे लोक दांडिया स्पर्धा ठेवतात. शेजारच्या गावातील काही चोर मात्र त्यांच्यावर जळत असतात म्हणून ते ठरवतात की बक्षिस चोरायचे आणि स्पर्धा उधळून लावायची. छोटा भीम त्यांचा प्लॅन हाणून पाडतो (म्हणजे त्या सर्वांना बुकल बुकल बुकलतो). साधारण सर्व एपिसोड्सचा हाच पॅटर्न असतो आणि बहुतेक गोष्टींची उत्तरे ही हिंसेतून मिळतात. आणि या शांतताप्रिय (?) गुजराती गावाचे दुष्ट आणि चोर शेजारी आहेत कोण आहेत? तर सावळे, शेंडी ठेवणारे, आडवे गंध लावून, लुंगी नेसून, दक्षिण भारतीय शैलीत बोलणारे लोक. दोन-तीन वर्षाचे, टीव्हीसमोर बसून डोळ्याची पापणीही न हालवता हे सर्व पाहणारे मूल आपोआपच यातून त्याची स्वतःची धोक्याची अणि योग्यायोग्य प्रतिक्रियांची समज बनवणार.

असहिष्णुतेचे, हिंसकतेचे पूर्वग्रहांचे पहिले धडे मुलांना अगदी लहान वयात मिळाले असले तरी एक समाज म्हणून त्यांच्या बदलासाठी काम करत राहणे आपल्याला सोडून चालणार नाही. जसजशा मुलांच्या सामाजिकीकरणाच्या कक्षा रुंदावत जातात तसतशी असहिष्णुता वाढत जाऊ शकते, पण तशीच ती कमीही होऊ शकतेच. नेहमीच वर्गांमधून, मैदानांवरून, भावंडांमध्ये 'हा/ही भांडखोरच आहे, आक्रमकच आहे, काही मुले असतातच अशी', वगैरे मते व्यक्त करताना याचेही भान ठेवायला हवे की ही मुले दुखरी, एकटी अणि असुरक्षित वाटणारी आहेत. आज शाळा आणि इतर उपलब्ध सामाजिक व्यवस्थांमधून मुलांची मानसिक गरज समजून घेऊन त्यांची मने सुदृढ आणि निकोप बनवण्याचा प्रयत्न होत राहायला हवा.

मुलांच्या प्राथमिक भावनिक गरजा पूर्ण करणे, आपण त्यांच्याकडे कोणत्या प्रकारचे पूर्वग्रह संक्रमित करतो आहोत याचे भान पाळणे याचबरोबर त्यांच्या मनातील असुरक्षितता कमी करण्यास मदत करणे हे मुलांचे मानसिक आरोग्य आणि पर्यायाने सामाजिक आरोग्यही सांभाळण्यासाठी गरजेचे आहे. होऊ घातलेली पालक म्हणून, शाळांशी संबंधित व्यक्ती म्हणून आणि समाजाचा घटक म्हणून मला ही माझी मोठी जबाबदारी वाटते.

गिरिजा तुळपुळे
girija.tulpule@gmail.com
9833245822

शिशूंना उद्दीपन

(पान ११ वरून)

३) खारीक, खजूर, बिस्कीट, फळे, पोळी, शंकरपाळे मुलांना हाताने खाऊ द्यावेत

कारक उद्दीपन

१) जोडता मोडता येणारी खेळणी
२) ब्लॉक्स
३) चेंडू फेकणे
४) चाकावर चालणारी खेळणी
५) खडूने रेघोट्या मरणे

भाषिक उद्दीपन

१) प्राण्यांचे आवाज
२) गाणी म्हणणे
३) खंजिरी, शिट्टी, वेगवेगळी वाद्ये वाजवणे
४) वेगवेगळ्या वस्तू दाखवून त्यांची नावे सांगणे
५) दोन तीन शब्दांच्या सूचना देणे उदा. हात वर कर, टाटा कर

मुलांना उद्दीपन आपण केव्हाही देऊ शकतो. बाळ उठल्यापासून निजेपर्यंत आपण बाळाबरोबर विविध प्रकारच्या आंतरक्रिया करू शकतो आणि त्यांना विविध अनुभव देऊ शकतो. या सर्व गोष्टींचा संबंध बालकाच्या विकासावर थेट होतो. तरी आपण सर्वांनी मिळून मुलांना जास्तीत जास्त उद्दीपन देऊन त्याच्या विकासाला गती मिळण्याच्या कार्याला हातभार लावूया.

सुषमा साठ्ये
sathayesushama@gmail.com
9850039272

माझ्या मुलीने काय शिकावे असे मला वाटते?

डॉ. नीलिमा गोखले डॉ. मंजिरी निंबकर

छोट्या मुलांचे चार पालक एकत्र जमले की त्यांच्यात साधारणतः आपल्या मुलांच्या शिक्षणाबद्दल गप्पा होतात. यात अर्थातच अनेक विषय असतात. अगदी शाळा प्रवेशापासून ते अभ्यासक्रम, शिक्षक, परीक्षा आणि मुलांवरील ताणापर्यंत. अशी चर्चा आता आपल्या समाजात फक्त कुठल्या एका विशिष्ट सामाजिक स्तराशी सीमित राहिलेली नाही. प्रत्येकाला आपल्या मुलासाठी उत्तम 'शिक्षण' हवे असते. परंतु पालक किंवा समाज किंवा त्या विशिष्ट खात्याचे अधिकारी म्हणून आपली सर्वांची 'उत्तम शिक्षणाची' व्याख्या एक आहे का? 'उत्तम शिक्षणा'बद्दल लोकांचे विचार काहीही असोत, शिक्षण क्षेत्रात मात्र सध्या तरी 'उत्तम गुण व परीक्षेतील यश' हाच चांगल्या शिक्षणाचा मापदंड दिसतो.

पालक म्हणून आपल्या मनात 'शिक्षण म्हणजे नक्की काय' याची स्वच्छ समज हवी. आपण स्वतःलाच प्रश्न विचारायला हवा की मला माझ्या मुलीने काय शिकावे असे वाटते? वैयक्तिक पातळीवर बहुसंख्य पालकांचे उत्तर असेल 'माझ्या मुलीने शाळा-कॉलेजात यशस्वी व्हायला हवे. भविष्यात उत्तम कमावून सुस्थितीत आयुष्य घालवण्यासाठी ते आवश्यक आहे.'

'यशस्वी' याचा नक्की अर्थ काय? बालशाळेपासून घेतल्या जाणाऱ्या सर्व चाचण्या व परीक्षांमध्ये चांगले गुण मिळवणे? निवडलेल्या व्यवसायामध्ये यश मिळवणे? पैसा कमावण्यासाठी संधी मिळवणे? का स्वतःचे वैयक्तिक आयुष्य सुखाने जगतानाच समाजातील सनदशीर मार्गाने जगणारा, कायद्याचा आदर करणारा, कर्ता नागरिक बनणे?

वैयक्तिक पातळीवर उत्तरे वेगवेगळी येतील. पण समाजाच्या, देशाच्या पातळीवर मात्र शेवटचा पर्याय हेच उत्तर असू शकते. स्वतःचे आणि लोकांचे आयुष्य सुखी करण्यासाठी समस्या समजावून घेऊन योग्य निर्णय करणाऱ्या विचारी नागरिकांची आपल्याला गरज आहे. तरच ही लोकशाही जिवंत आणि निरोगी राहील.

काही महिन्यांपूर्वी मी एका मराठी बातम्यांच्या वाहिनीवर एक परिसंवाद ऐकत होते. विषय होता, प्राथमिक शाळेत इंग्रजीची सक्ती करावी की नाही. पॅनेलवरील दोन सदस्य असा विचार मांडत होते की मुलांना लहान वयातच इंग्रजी शिकवणे चांगले. कारण ती संवादापुरते इंग्रजी बोलू शकली तर त्यांना मॉल, रेस्टॉरंट, कॉल सेंटर अशा ठिकाणी नोकरी लागू शकते. आपण जर शिक्षणाकडे फक्त नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून बघत असलो तर हा मुद्दा पटण्यासारखा आहे. तिसरे गृहस्थ मात्र शिक्षणाकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून बघत होते. ते म्हणाले की आपली पुढली पिढी स्वतंत्र विचार करणारी, समस्या सोडविणारी, संशोधक आणि तत्वज्ञानी व्हावी म्हणून आपले प्रयत्न असतील की मॉल, कॉल सेंटर व पिझ्झा रेस्टॉरंटसमध्ये काम करणारे कामगार व्हावे म्हणून? पालक म्हणून आपण याचा विचार करायला हवा.

आपणा सर्वांना माहीत आहे की आपली सद्य शिक्षण प्रणाली ज्यावर आधारित आहे त्या आराखड्याचे उद्दिष्टच मुळी साक्षर गुलाम निर्माण करण्याचे आहे - अशी माणसे की जी लिहू वाचू शकतात आणि सांगितलेल्या सर्व गोष्टींचे आंधळेपणाने पालनही करतात. जवळजवळ ७० वर्षांपूर्वी आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपली मूलभूत गरज आहे ती म्हणजे स्पष्ट, तार्किक विचार करणाऱ्या संशोधकांची. आपली सद्य शिक्षण प्रणाली मुलांच्यात ही कौशल्ये विकसित करू शकते का? दुर्दैवाने उत्तर आहे, नाही.

मग आता विचार करू की आपल्या वर्गात असे काय घडले पाहिजे की ज्यामुळे मुलांमध्ये स्वतंत्र विचार करण्याचे व समस्यापूर्ती करण्याचे कौशल्य जोपासले जाईल? बालशाळेपासूनच याची सुरुवात व्हायला हवी. बालशाळेत आपण मुळाक्षरे (घरच्या भाषेत असो किंवा दुसऱ्या एखाद्या पूर्ण अनोळखी भाषेत असो) शिकविण्यावर भर द्यावा का? आणि मुळाक्षरे म्हणजे काय व हे शिकून करायचे काय हेही न समजता ते पाठ करण्याची अपेक्षा ठेवावी का? हे केल्यामुळे ती शाळेत जाऊन औपचारिक शिक्षण घ्यायला तयार होतील व शालेय जीवनात यशस्वी होतील असे मानावे का? की घराबाहेर शाळेत व समाजात वावरण्यासाठी वर्तणुकीचे काही मूलभूत नियम शिकल्यावर शाळेची आणि जगण्याचीही त्यांची चांगली तयारी होईल? हे मूलभूत नियम म्हणजे बाहेर समाजात वावरताना स्वतःची काळजी घ्यायची, इतरांशी सहकार्याने वागायचे, रांगेत उभे राहायचे, दुसऱ्याची बाजू समजून घ्यायची, इत्यादी.

जर मुलांनी जगण्याचे नियम शिकावे असे वाटत असेल तर घोकंपट्टीत मुलांचा वेळ व शक्ती वाया न घालवता त्यांना विविध पदार्थ, वस्तू व गोष्टी हाताळून, आपली कल्पनाशक्ती वापरून त्यापासून काहीतरी बनवायची व आपण काय व कसे बनवले याविषयी आपल्या मित्र-मैत्रिणींशी व शिक्षकांशी बोलायची संधी द्यायला हवी. यात कसले शिकणे असे जरी वर वर पाहता वाटत असले तरी हे करीत असताना मुले अमूर्त विचार करायला व समस्या सोडवायला शिकतात. आलेल्या अनुभवातून त्यांची आपली एक समज तयार होऊ लागते. आपल्या कल्पना व विचार इतरांसमोर मांडण्याचे व त्यांच्या कल्पना व विचार ऐकण्याचे कौशल्य मुले शिकतात. इतरांबरोबर सहकार्याने काम करायला शिकतात. समजून घेणे व आपल्याला काय म्हणायचे ते मांडता येणे म्हणजेच तर

औपचारिक शालेय शिक्षण होय.

माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात जग वेगाने जवळ आले आहे. लोक एकमेकांकडून (देश-परदेशातील दूरदूरच्या व्यक्तींकडून) शिकत आहेत. एकमेकांना समजून घेत आहेत. एकमेकांबरोबर आपल्या कल्पना व विचारांची देवाण-घेवाण करीत आहेत. आपल्या मुलांनीही इतरांबरोबर सहकार्याने काम करायला शिकायला पाहिजे. ती वेळेची गरज आहे.

नुकतेच 'व्यावसायिक जगतातील सहकार्य' यावर झालेले एक जागतिक पातळीवरील सर्वेक्षण आपल्या एका आघाडीच्या वर्तमानपत्रात छापून आले होते. त्यात भारतीय व्यावसायिकांचा नंबर बराच खाली होता. त्यात असे म्हटले होते की भारतीय व्यावसायिक आपापल्या क्षेत्रात खरोखर चमकदार कामगिरी करणारे होते. परंतु गटात काम करण्याची त्यांची कौशल्ये फारच अविकसित होती. हे आपण कसे बदलू शकतो?

गटामध्ये सहकार्याने इतरांबरोबर काम करायचे तर मुलांमध्ये स्वयंनियंत्रण, तार्किक विचार, समस्यापूर्ती आणि संवाद ही कौशल्ये विकसित करावयास हवीत. या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असून त्या मुले 'शिकतील अनुभवाने' असे म्हणून सोडून न देता पालकांनी हेतुपुरस्सर काम करून ही कौशल्ये विकसित करायला हवीत.

पालक काय करू शकतात?

अगदी लहान असतानाच आपल्या पाल्याला कशात रस आहे ते जाणून घ्या. उदा. तिला इतर मुलांबरोबर खेळायला आवडते की आपले आपण एकटेच राहायला आवडते? तिला जर इतरांशी खेळायला फारसे आवडत नसेल तर का ते शोधून काढा व तिला त्या मानसिकतेतून बाहेर यायला मदत करा. यामुळे तुम्हाला तुमच्या मुलीची ओळख तर होईलच पण तुम्ही तिला पद्धतशीरपणे समस्येची कशी उकल करावयाची हे प्रत्यक्षच दाखवू शकाल.

तुमच्या मुलीला तुमच्या रोजच्या कामात घ्या. खोली आवरताना, कपडे ठेवताना, बाजारातून आल्यावर भाज्या-फळे वेगवेगळी करताना तिला मदतीला घ्या. ती मदत करताना तिच्याशी बोला. ही शब्द-भांडार वाढविण्याची व भाषा विकासाची अपूर्व संधी आहे.

मुलांना आपल्या खेळांशी नीट खेळायला आणि खेळून झाल्यावर वस्तू जागच्या जागी ठेवून आपल्या वस्तूंची काळजी घ्यायला शिकवा.

जर घरी जवळचे भावंड किंवा भेटायला आलेले भाऊ बहीण असतील तर त्यांच्याबरोबर आपले खेळ, खाऊ, जागा, टीव्हीचा वेळ इत्यादी कसे वाटून घ्यायचे ते शिकवा. यातून हळू हळू मुले या गोष्टी आपल्याआपण करायला शिकतील.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलांचे ऐका. तुमच्या स्वप्नातही नसतील असे विचार तुम्हाला त्यांच्याकडून ऐकायला मिळतील.

डॉ. नीलिमा गोखले
neelima.gokhale@gmail.com
9823053272

डॉ. मंजिरी निंबकर
manjunimbkar@gmail.com
9822040586

दि वा ळी अं क २ ० १ ५

मुलांच्या शंभर भाषा

शंभराचं आहे मूल...आहेत मुलाकडे शंभर, भाषा हात आणि विचार

वेगवेगळ्या मूर्त, अमूर्त गोष्टींची प्रतीके, ठरलेल्या शब्दांना विशिष्टरित्या वाक्यांच्या साखळ्यांमध्ये बांधून सभोवतीच्या माणसांशी विचारांची देवाणघेवाण करण्याची माणसाला सुचलेली कल्पना म्हणजे भाषा. जन्माला येणारे प्रत्येक मूल आपल्या अवतीभवतीच्या जगाशी सतत संपर्क करण्याच्या प्रयत्नात असते. पण त्याची भाषा जरा हटके असते. किंबहुना ती एक नसतेच मुळी! त्याच्या इतरांना सांगण्याच्या, समजून घेण्याच्या स्वतःच्या अशा अनेकविध भाषा असतात. त्याच्या भाषांमध्ये दडलेले असतात त्याचे खेळ, मजा करण्याच्या, ऐकण्याच्या, विचार करण्याच्या पद्धती, भावना आणि सृजनशीलता. या साऱ्यांचाच वेध घेणारा अंक म्हणजे पालकनीतीचा यंदाचा दिवाळी अंक.

दि वा ळी अं क २ ० १ ५

Published & Posted on 16 September 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

शहाणी वेबपाने

मानवतावादी, स्पष्ट आणि खणखणीत!

‘‘ताई, माझ्या आईचे केस कुरळे म्हणून माझे पण कुरळे हे ठीक आहे. कारण मी आईच्या पोटातून आले. पण बाबांचे गुणधर्म माझ्यात कसे?’’ सहावीतल्या श्रेयानं प्रश्न विचारला आणि वर्गात चर्चा सुरू झाली. मुलांकडून कळलं की ‘बाळ कसं होतं’ या प्रश्नाचं उत्तर देणं बहुतेक पालकांनी टाळलं होतं– एक तर प्रश्नाकडे पूर्ण दुर्लक्ष करून किंवा काहीही मूर्खासारखं विचारू नकोस म्हणून रागवून. किंवा मग आईला इंजेक्शन दिलं की बाळ होतं असं काहीतरी सांगून पोरांना गुंडाळण्यात आलं होतं. पण मुलं म्हणजे जात्याच जिज्ञासू. कुठूनतरी काहीतरी शोधून काढणारच. त्यांना कसली माहिती कुठून मिळाली आहे, त्याबाबत त्यांचे कसकसले ग्रह तयार झाले आहेत आणि त्यांच्या पुढच्या आयुष्यात त्याचे कसले परिणाम दिसून येतील या सर्वाचं गांभीर्य आपल्याला अजूनही नीटसं उमगलेलं नाही हेच खरं.

वाढत्या वयात योग्य पद्धतीनं लैंगिकतेची माहिती मिळणं आणि त्याबद्दल एक चांगली, निकोप भावना समाजात तयार होणं हे सामाजिक स्वास्थ्यासाठी अत्यावश्यक आहे. परंतु लैंगिकता या विषयावर बोलण्यास एक समाज म्हणून आपण कधीच फारसे कम्फर्टेबल नव्हतो. बहुतेकांना आपल्या मुलांशी या बाबतीत बोलणं अजूनही अवघड वाटतं. या परिस्थितीत इंटरनेटनं आपलं हे काम कधी नव्हे एवढं सोपं केलेलं असलं तरी चांगला, संतुलित दृष्टिकोन मांडणाऱ्या वेबसाईट्स शोधणं आणि समजून घेणं हे एक आव्हान आहेच. त्यामुळेच तथापि ट्रस्ट – ‘स्त्रिया आणि आरोग्य संसाधन केंद्र’ या पुणे स्थित संस्थेनं नुकतीच सुरू केलेली letstalksexuality.com ही मराठी वेबसाईट महत्त्वाची ठरते.

लैंगिकतेबद्दलची इतकी मानवतावादी भूमिका आणि मांडणीतील स्पष्टता आज मराठीमध्ये ऑनलाईन क्वचितच उपलब्ध असेल. मनुष्यप्राण्याच्या बाबतीत लैंगिकता ही केवळ प्रजननाशी निगडित नसते. तिला भावनिक गुंतवणुकीचे आणि सत्तासंबंधांचे अनेक कंगोरे असतात. या सर्वांना कुठे न कुठे स्पर्श करण्याचा प्रयत्न letstalksexuality.com करते. ‘लैंगिकता म्हणजे?’, ‘आपली शरीरे’, ‘प्रेम FRAME’, ‘लिंगभावाची व्यवस्था’, ‘मेरी मर्जी’, ‘सेक्स बोलें तो’, या सदरांच्या नावांवरूनच वेबसाईटचा आवाका लक्षात यावा. इथे वैज्ञानिक स्पष्टीकरणे तर आहेतच पण त्याचबरोबर शरीराचं भान, आरोग्य, हिंसा व छळ, लैंगिकताविषयक कायदे, संमतीचा हक्क, नात्यांमधील दबाव व नियंत्रण, विविध लैंगिक कल यांचीही चर्चा आहे. मजकुराला खूप वेगवेगळ्या प्रकारच्या शैलींमधल्या चित्रांची समर्पक जोड वेबसाईटच्या वैविध्य जपण्याच्या आवाहनाला अधोरेखितच करते.

वेबसाईटच्या वर्णनात दिलं आहे– ‘इट इज अ प्लॅटफॉर्म टू लर्न, आर्ग्यू अँड क्लॅरिफाय.’ आणि वेबसाईट चाळताना ते लक्षात येतंच. नेहमी विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची नेमकी, स्पष्ट उत्तरं इथं मिळतात आणि नव्यानं मनात येणारे प्रश्न विचारण्यासाठी, मतं मांडण्यासाठीही इथं जागा आहे.

ही वेबसाईट १६ वर्षांपुढील व्यक्तींसाठी योग्य आहे त्यामुळे मुलांना थेट पाहायला देता आली नाही तरी चर्चेसाठी यातले मुद्दे जरूरच वापरता येतील. खरं तर अभ्यास करून आपली स्वतःची समज वाढवण्यासाठीचं पालक आणि शिक्षकांसाठी हे एक उत्तम साधन आहे असं म्हणायला हरकत नाही.

आज प्रत्येकाच्या तळहातावर इंटरनेट असताना आणि त्याच्या माध्यमातून समोर सगळं जग खुलं असताना पॉर्न बंदीऐवजी लैंगिकता शिक्षणावर भर देणं कधीही जास्त विवेकी असणार आहे आणि या दृष्टीनं ‘तथापि’नं उचललेलं हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे.

सगळं नॉर्मल आहे

आपण सगळे मानव आहोत. आपण सगळे एक आहोत तरी आपल्यातला प्रत्येक जण वेगळा आहे. माझा रंग काळा आहे पण माझी मैत्रीण गोरी आहे. मी जाड आहे तर माझा भाऊ लुकडा. काही जणांच्या शरीरात लिंग आणि वृषणं असतात तर काहींच्या शरीरात गर्भाशय आणि योनिमार्ग. काहींना दिसतं, ऐकू येतं तर काहींना नाही. काही जण प्रेमात पडतात तर काहींना प्रेमाशी काहीच देणं घेणं नसतं. काहींच्या शरीरावर केस असतात तर काहींच्या नसतात. तरीसुद्धा आपण सगळे मानव आहोत. आपली शरीरं जशी वेगळी आहेत तशाच आपल्या भावना आणि कल्पनादेखील भिन्न आहेत. आपल्या आवडी निवडी वेगवेगळ्या असल्या तरी आपला उगम एकच आहे. काही मुलींना १० व्या वर्षीच पाळी येते तर काहींना येतच नाही. काही मुलांना झोपेत वीर्य बाहेर येण्याचा अनुभव आला असेल तर काहींना नाही. काही स्त्रिया आई होतात तर काही ठरवून मुलं जन्माला घालत नाहीत. काहींना पुरुष आवडतात तर काहींना स्त्रिया. काहींना संग करायला, सेक्स करायला आवडतं तर काहींना त्यात काडीचा रस नाहीये. या सगळ्या गोष्टी नॉर्मल आहेत. आपण जसे आहोत तसं असणं नॉर्मल आहे. आणि आपण इतरांपेक्षा वेगळे असलो तरी त्यात वावगं काही नाही.

स्रोत – तथापि ट्रस्ट निर्मित Let's Talk Sexuality – सेक्स आणि बरंच काही

मधुरा राजवंशी
rmadhuraa@gmail.com
8275369702